# IIसंस्कृती II

# IISANSKRUTIII

मराठी भाषिक मंडळ, एडमंटन, वार्तापत्र, वर्ष १, क्र. १ मार्च - २००९

Marathi Bhashik Mandal, Edmonton, Newsletter, Year 1, Vol. 1 March - 2009

## संपादकीय :

नमस्कार मंडळी !

Welcome to the inaugural issue of *SANSKRUTI*, a quarterly newsletter of Marathi Bhashik Mandal Edmonton. We are glad that a concept that was envisaged many months back has FINALLY seen the light of day.

इथे आलेले बहुसंख्य लोक आपल्या कर्तृत्वाची क्षितीजे विस्तारीत अनुभवाची व संस्काराची शिदोरी बरोबर घेऊन इथवर पोहोचलेली आहेत. इथल्या मातीशी, शिस्तबद्ध जीवन शैलीशी व सर्वस्वी भिन्न अशा संस्कृतीशी एकरुप होण्याचा, समरस होण्याचा प्रयत्न करीत आहेत. इथल्या संस्कृतीशी मिळते जुळते घेऊन आपल्यातील जेष्ठांनी, मराठी भाषिक मंडळाची गुढी २५ वर्षापूवी उभारली.

आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला रोजच तारेवरची कसरत करावी लागते तरीही आपण आपलं मराठीपण जपतच असतो. कितीही वर्षे भारताबाहरे राहिलो तरीही न विसरलं जाणारं हे मराठीपण हीच आपली खरी ओळख आणि ओढ आहे. ही ओढ जपण्यासाठीच स्थापन झालेली संस्था म्हणजे आपलं मराठी मंडळ!

गेली अनके वर्षे कित्येक मान्यवर व जेष्ठ बंधुभगिनींनी आपल्या निःस्वार्थ प्रयत्नांनी ही संस्था टिकवली व वाढवली, त्या सर्वांचे आपण कायमचे ऋणी राहू.

With the same goal in mind and to further extend the boundaries of our mandal, we have come up with this newsletter. We have already had a generous outpouring of support from the MBME members and we are grateful to all who have helped contribute whether by providing information or even partnering with us to produce special recurring features. We hope to grow the newsletter in the coming editions to incorporate even more involvement from our members, whether it is by submitting articles, stories, poetry's and jokes or even just posting ads or classifieds with our publication.

Let us all join in celebrating publication of our first edition. We hope you enjoy the features and articles in this edition and those that follow, and we encourage you all to help shape the face and impact of the newsletter in the years to come...

MBME committee

"*A person, who never made a mistake, never tried anything new*" Albert Einstein

INSIDE THIS ISSUE


2 आरोग्य आणि स्वास्थ्य

3 लेख – Holi in Maharashtra

4 लेख – जुन्या आठवणी दाटून येतात तेव्हा ……

5 हास्य – विनोद



कार्यकारी समिती :

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | : | विलास नाइकडे | ७८० ४१६ ४४३१ |
| उपाध्यक्ष | : | अभिजीत जाधव | ७८० ४३९ ८९८० |
| सचिव | : | अशोक पाटील | ७८० ४५० ३६२४ |
| खजिनदार | : | सुनील काशिद | ७८० ४६३ ५६९९ |
| सांस्कृतिक कार्यकर्ती | : | मोनिका वानखडे | ७८० ७५६ ९७०८ |


# आरोग्य आणि स्वास्थ्य

## स्वास्थ्यासाठी योग

बदललेल्या जीवनशैलीमुळे बध्दकोष्ठतेसारखे त्रास मागे लागतात. जेवणाच्या – झोपण्याच्या अनियमित वेळा, बाहेरचे खाणे, चहा-कोफी, बैठे काम आणि त्याबरोबरच रोजची धावपळ काही टाळता येत नाही. मानसिक ताणतणावही असतातच. रोजच्या रोज पुरेसा व्यायाम होतोच असे नाही. रोजच्या शारीरिक हालचाली काही वेळा अपुर्‍या पडतात. दिनचर्या किंवा शरीराला घातक गोष्टी नेहमीच टाळता येत नसल्या तरी त्याचा त्रास होऊ नये म्हणून काही आसने करता येतील. बध्दकोष्ठतेचा त्रास असलेल्यांसाठी ही आसने उपयुक्त ठरतील.

**अग्निसार** : पद्मासन वा सुखासनात बसावे. दोन्ही हातांचे तळवे दोन्ही गुडघ्यांवर असे ठेवावेत की कोपर बाहेर येतील व शरीराचे वजन तळहातांवर येइल. संपूर्ण श्वास सोडून पोट आत ओढावे व बलपूर्वक बाहेर फेकावे. याप्रमाणे श्वास न घेता शक्य तितके हबके पोटाला ध्यावे. श्वास घ्यावासा वाटला की हबके देणे बंद करून पूर्ण श्वास भरावा. चार – पाच स्वाभाविक श्वास – प्र श्वास करून दुसरे आवर्तने करावेत.




सुचना : हा योग करण्या आधी डोक्टरांचा (Doctor) सल्ला घेणे.

# Holi in Maharashtra

People of Maharashtra have their own grand style of celebrating Holi. Besides other things, not to be missed is the mouthwatering delicacy- Puranpoli.

**Holi is called Shimga or Rangpanchami**

People of Maharashtra commonly know this festival of colours by the name of Shimga or Rangpanchami. For, the play of colours is reserved for the fifth day here.

The festival is particularly popular amongst the fisher folk. They celebrate it in on a large scale and revel in the festivities by singing, dancing and merry-making. This special dance provides them means to release all their repressed feelings, needs and desires. People also utter sound through their mouths in a peculiar fashion by striking their mouths with the back of their hands.

**Historic significance of Holi in Maharashtra**
During the Maratha regime this festival was celebrated with great pomp and grandeur. It was on a Holi festival day that five-year-old Jijabhai, daughter of Lakhooji Jadhav innocently splashed coloured water and threw gulal on young Shahaji, son of Malojirao Bhosale. Taking it as an auspicious event, the two children's engagement was announced that very day. Soon they were married. Later, Jijabhai gave birth to Shivaji, the founder of great Maratha Empire.



**The Legend of Holika and Prahlad**

There was once a demon king by the name of Hiranyakashyap who won over the kingdom of earth. He was so egoistic that he commanded everybody in his kingdom to worship only him. But to his great disappointment, his son, Prahlad became an ardent devotee of Lord Narayana and refused to worship his father.

Hiranyakashyap tried several ways to kill his son Prahlad but Lord Vishnu saved him every time. Finally, he asked his sister, Holika to enter a blazing fire with Prahlad in her lap. For, Hiranyakashyap knew that Holika had a boon, whereby, she could enter the fire unscathed.

Treacherously, Holika coaxed young Prahlad to sit in her lap and she herself took her seat in a blazing fire. The legend has it that Holika had to pay the price of her sinister desire by her life. Holika was not aware that the boon worked only when she entered the fire alone.
Prahlad, who kept chanting the name of Lord Naarayana all this while, came out unharmed, as the lord blessed him for his extreme devotion. Thus, Holi derives its name from Holika. And, is celebrated as a festival of victory of good over evil.

Holi is also celebrated as the triumph of a devotee. As the legend depicts that anybody, howsoever strong, cannot harm a true devotee. And, those who dare torture a true devotee of god shall be reduced to ashes.

- ***Abhijit Jadhav***

**येणारा सण:**

गुढीपाडवा



# जुन्या आठवणी दाटून येतात तेव्हा ......

संध्याकाळी घरात एकटी होते त्यावेळी घरात गाणं ऐकुण मन एकदम भरून आले. आईची मातृभुमीची व घरातील सर्व मंडळीची आठवण झाली आणि डोळ्यात पाणी आले.

गेल्या ३५ – ३६ वर्षाचा आयुष्याचा सर्व काळ डोळ्यासमोर उभा राहीला व मी स्वतःशी बोलायला लागले. विदर्भातल्या एका छोट्याशा गावात वाढलेली मध्यमवर्गीय घरातुन १८ वर्षापूर्वी मी प्रथम विदर्भ व नंतर भारताच्या बाहेर पडले व मिस्टरांच्या नोकरी निमीत्ताने कुवैतला आले. संसार, नवरा, दोन मुले यांच्या नादात १८ वर्षे कशी गेली कळलेच नाही. कुवैतहून एडमंटनला आले. सुरवातीला कुवैतच्या मैत्रीनींना खूप मिस केले. पण हळूहळू एडमंटनच्या लोकांशी परीचय वाढला व त्यांच्या प्रेमळ स्वभावाचा व नेहमीच मदतीचा हात पुढे करण्याच्या स्वभावाचा अनुभव आला. वेळोवेळी मैत्रीणींनी जी मदत केली ती पाहुन मी भारावुन गेले. नकळत मी या सर्वांशी माझ्या भारतातील नातेवाईकांशी तुलना करू लागले. इथली माणसं रक्ताचं नातं नसतानाही इतक्या आपूलकीने वागतात. एकत्र येऊन सणवार व एकदुसऱ्यांचे वाढदिवस साजरे करतात. पण आपली मायेची रक्तांची माणसं भारतात गेल्यावर आपल्याशी दुरावा करून वागतात, परकी होतात असे का व्हावे? हा फक्त माझाच अनुभव आहे की माझ्यासारख्या मायभुमीपासून दुर राहणाऱ्या प्रत्येक संवेदनाशील मानसाचा आहे? हा अनुभव व्यक्तीगत आहे की सार्वजनीक ?

ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे शोधतांना मी स्वतःशीच बोलु लागले असं वाटतय की आपल्या माणसांचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. खरं तर प्रत्येक जण आपल्या नशीबाने प्रगती करत असतो. आपण इथे भरपुर पैसा कमवतो हे खरं आहे, पण काय गमावुन व कीती किंमत देऊन कमवतो याची त्यांना कल्पना नसते.

इथली सुख दुःख आपल्यालाच माहीत असतात. इथे पैसा मिळविण्यासाठी आपण स्वदेशातले प्रेम, आपले आप्तजण इत्यादींना मुकतो. इथले कायदे कानुन पाळण्यासाठी सारखी तारेवरची कसरत करत असतो. आपल्या देशाला व माणसांना आठवून homesick होत असतो, त्यामुळे जेव्हा जातो तेव्हा त्यांच्या प्रेमाला आसुसलेले असतो. पण आपलीच माणसं आपणापासुन दुर गेल्यासारखे वाटतात. अशा वेळेला वाटते की आपण परदेशात नोकरी करतो म्हणजे परदेशी झालो की काय ? सुरवातीला पत्र व्यवहार व्हायचा पण त्याची जागा E-mail ने घेतलेली आहे. भेटने, जेवायला बोलावणे एवढ्या पुरतीच संबंध टिकले आहे. आपल्यासाठी वेळ देणे, स्वतःचे रूटीन बदलणे यापैकी काहीही करायची त्यांची तयारी नसते.

माझ्यासारख्या असंख्य मुली, सुना, बहिनी परदेशात राहात आहेत. त्यांच्या पाठीवरून आपल्या मातीतल्या माणसांचा, मित्र – मैत्रीनींचा प्रेमाचा हात फिरेल तेव्हा त्या खऱ्या अर्थाने सुखी होतील व त्या खऱ्या अर्थाने आनंदाने, समाधानाने राहतील..

**- सौ. सुनिता वासुदेव झोडे**



Map of Maharashtra

# हास्य – विनोद

## बायको

बायको ही बायकोच असते. बायको हे एक हक्काचे गाव असते. तिच्या नावामागे आपलेच नाव असते. माहेरच्या कुंपणापर्यंतच तिची धाव असते. आपल्याच घरात आपण चोर आणि ती साव असते

लग्न करून घरात आणतो. तेव्हा ती नववधू असते. तेव्हा तिच्या प्रेमापायी तिच्या चुकांकडे पाहणारी आपलीच नजर अधू असते

हळूहळू आपल्या तालावर ती आपल्याला नाचायला लावते. तिची चूक असतानासुद्धा उलट आपलेच पाढे वाचायला लावते

कधीतरी प्रेमाने आणलेला गजरा नकार देतच केसांत माळणारी असते. आपले प्रेमाचे दोन शब्दसुद्धा संशयाच्या चाळणीने चाळणारी असते

घरात मोलकरीण असली तरी तिचे सतत आपल्यावरच लक्ष असते. तुझी विटलेली साडी तिला दे. एवढे शब्दसुद्धा तिचे भक्ष असते

सतत माहेरचा गोडवा गाणारी ती एक अंबा असते. सतत सासरला तुच्छ लेखणारी ती एक जगदंबा असते.

घरात असली की अडचण वाटते. जवळ नसली की चणचण भासते. मग आपलीच मात्र वणवण असते.

बायको चहावरची तांबडी साय असते. आपल्याच लेकरांची ती माय असते. संकटाला धावून येणारी आपलाच पाय असते. कधीकधी ती गरीब गोगलगाय असते

जीवनभराची ती एक छाया असते. सदा रसरसलेली तिची काया असते. कधीकधी ती काजळ माया असते. सुगंधी अत्तराची ती एक फाया असते.

बायको ही बायकोच असते. आयुष्यभराची ती गुरू असते. तुम्हाला काही कळत नाही. अशी सतत तिची टकळी सुरू असते

आयुष्यात अनेक संधी येतात आणि जातात. परंतु बायको येते ती जाण्याचे नावच घेत नाही.

- सुभाष नागे

## UPCOMING EVENTS

३० मे २००९ महाराष्ट्र दिवस

## REMAINING EVENTS OF THE YEAR

June 27/09 Saturday - Picnic (Tentative)
Sept 06/09 Sunday - Ganapati
Nov 07/09 Saturday - Diwali
Nov 29/09 Sunday -Dyaneshwar Jayanti

## MISCELLANEOUS

New website of our Mandal launched. Please visit www.mbmedmonton.org